प्रकरण : दोन

# रा. रं. बोराडे यांची ग्रामीण साहित्यविषयक आणि कादंबरी लेखनामागील भूमिका व प्रेरणा

प्रकरण – दोन

# रा. रं. बोराडे यांची ग्रामीण साहित्यविषयक आणि कादंबरी लेखनामागील भूमिका व प्रेरणा

**प्रस्तावना :**

यापूर्वीच्या प्रकरणामध्ये ग्रामीण कादंबरीची वाटचाल आणि विकास लक्षात घेतला. या प्रकरणामध्ये ग्रामीण साहित्यिक म्हणून रा. रं. बोराडे यांची ग्रामीण साहित्याविषयीची आणि कादंबरी लेखनामागची भूमिका व प्रेरणा पहावयाची आहे. तसेच त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व लक्षात घेऊन, त्यांनी मराठी वाङ्मयात घातलेली मोलाची भर याचाही थोडक्यात परिचय करून घेता येईल.

मराठी ग्रामीण कथा-कादंबरीच्या क्षेत्रात व्यंकटेश माडगूळकर व शंकर पाटील यांच्यानंतरचे महत्त्वाचे ग्रामीण लेखक म्हणजे रा. रं. बोराडे हे आहेत. बोराडे यांनी ग्रामीण साहित्याच्या चळवळीला काही एक प्रमाणात योगदान दिलेले आहे. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, समीक्षा इ. अनेक वाङ्मयप्रकार हाताळलेले आहेत. ग्रामीण जीवनातील सामाजिकता, वास्तवता आणि मानवी जीवनातील नातीगोती यांचे परस्पर भावबंध व समस्या यांचे प्रत्ययकारी चित्रण रा. रं. बोराडे यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यामध्ये केलेले आहे.

रा. रं. बोराडे हे एक महत्त्वाचे ग्रामीण साहित्यिक आहेत. म्हणून त्याच्या लेखनाविषयी आणि ग्रामीण साहित्य चळवळीविषयी त्यांची नेमकी भूमिका व प्रेरणा कोणती आहे? तसेच त्यानंतर त्यांच्या कादंबरीलेखना मागील त्यांची असलेली भूमिका व प्रेरणा लक्षात घेऊ. ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणारे, ग्रामीण जीवनाचे भाष्यकार, मराठवाड्यातील लोकजीवनाचे सर्वसंदर्भानिशी चक्षुर्वैसत्य दर्शन घडविणारे एक समर्थ साहित्यिक म्हणून रा. रं. बोराडे यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो.

**रा. रं. बोराडे यांचा व्यक्तिपरिचय :**

रावसाहेब रंगराव बोराडे यांचा व्यक्तिपरिचय करून घेतला असता, त्यांचा जन्म मराठवाड्यातल्या लातुर जिल्ह्यातील काटगांव या खेड्यात २५ डिसेंबर १९४० रोजी एका सामान्य अशा शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण एम्.ए. (मराठी) पर्यंत झाले. त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केले तसेच पुढे त्यांनी प्राचार्य पदावरही काम केले.

रा. रं. बोराडे यांना अनेक सन्मान लाभले. मार्च १९८० मध्ये कोपरगांव येथे झालेल्या

नगर जिल्हा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांच्याकडे होते. ऑक्टोबर १९८१ मध्ये बहिरगांव (ता. कन्नड) येथील ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. फेब्रुवारी १९८६ मध्ये धर्माबाद येथे झालेल्या मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने जून १९८९ मध्ये हिंगोली येथे झालेल्या १७ व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बोराडेच होते. तसेच जामखेड येथे डिसेंबर १९९१ मध्ये झालेल्या दुसऱ्या मध्य महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बोराडे होते.

रा. रं. बोराडे यांच्या अनेक पदांवर नियुक्त्या झालेल्या होत्या. १९८१ ते १९८८ या कालावधीत आकाशवाणी औरंगाबाद केंद्राच्या कार्यक्रम सल्लागार मंडळाच्या सदस्यपदी त्यांची नियुक्ती झाली होती. १९८६ ते १९८९ या कालावधीत महाराष्ट्र पातळीवरील ग्रामीण साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी निवड झाली होती. नोव्हेंबर १९८८ साली स्थापन झालेल्या दलित आदिवासी ग्रामीण संयुक्त महासभेच्या उपाध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. १९९० ते १९९३ या कालावधीत महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. तसेच ११ जून, १९९८ पासून १० जुलै, २००० पर्यंत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक राज्य शिक्षण मंडळावर सदस्य तसेच राज्य मंडळाच्या कार्यकारी परिषदेवर सदस्य म्हणून काम केले. याच कालावधीत औरंगाबाद विभागीय मंडळावरही सदस्य म्हणून त्यांनी काम केले.

सध्या रा. रं. बोराडे २००० - २००१ या वर्षापासून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष तसेच महाराष्ट्र राज्याच्या विश्वकोष निर्मिती मंडळाचे सदस्य म्हणून काम करीत आहेत. त्यांना २०००-२००१ साली मराठवाडा लोकविकास मंच मुंबई या संस्थेचा मराठवाडा गौरव पुरस्कार मिळाला. १९९९ ते २००० या वर्षीचा महाराष्ट्र शासनाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत महाविद्यालयीन पातळीवरचा आदर्श शिक्षकाचा पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

**<u>बोराडे यांची साहित्य लेखनामागची भूमिका आणि प्रेरणा :</u>**

रा. रं. बोराडे यांचा जन्मच शेतकरी कुटुंबात झाला. त्यामुळे बालपणापासूनच खेडूत जीवनाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. ही लेखनामागची प्रेरणास्थाने त्यांना मराठवाड्यातील लातुर, औसा, सारणी, मुरूड या परिसरातील ओसाड माळरानातील माणसांकडून मिळाली आहे. येथील कर्जबाजारी शेतकरी, त्यांचे अठराविश्व दारिद्र्य, सरकारी अधिकाऱ्यांकडून

होणारी पिळवणूक त्यांनी आपल्या साहित्यात चित्रित केली आहे. येथील लोकांच्या जीवन जगण्याच्या पद्धती, प्रथा, परंपरा, अडाणीपण, कष्टमय जीवन तरीही अशा प्रकारच्या जीवनात जगण्यासाठी येथील माणसांची चाललेली धडपड व त्यातून निर्माण होणारे तणावपूर्ण प्रसंग हे सारे बोराडे यांनी जवळून अनुभवले आहे. तेच अनुभव त्यांना लेखनास प्रेरणा देणारे ठरले.

बोराडे यांनी सुरूवातीपासूनच ग्रामीण जीवनाचे वास्तव रेखाटले आहे. ग्रामीण जीवनाशी बांधून ठेवणारी नाळ त्यांनी तुटून दिली नाही. त्यामुळेच ते उत्कृष्ट साहित्यनिर्मिती करू शकतात. उत्तरोत्तर त्यांच्या लेखनाला बहरच आल्याचे दिसते. लेखक बोराडे यांना गावाकडचा ओढा आहे. त्यामुळे तेथील माणसांच्या सुखदुःखात सहभागी होणं, गावातील - गावच्या शिवारातील परिवर्तने यांचे बारकाईने निरीक्षण करणं, जुन्या आठवणींना उजाळा देत असताना सकस अशी कथाबीजं बोराडे यांच्या संवेदनशील मनाला दिसत असत. त्यामुळेच गावगाड्यातील अनेकविध व्यवहार ग्रामीणांच्या बोलीतून त्यांना सहज शक्य होत असे.

आपल्या लेखनाने आकार कसा घेतला याविषयी रा. रं. बोराडे म्हणतात, ''१९५७ च्या आसपास कधी तरी व्यंकटेश माडगूळकरांची 'माणदेशी माणसं' व 'गावाकडच्या गोष्टी' ही पुस्तकं माझ्या हाती आली. झपाटल्यावानी मी ही पुस्तकं वाचून काढली. माणदेशातील माणसं, त्यांचं वागणं-बोलणं, त्यांच्या जीवनात घडणाऱ्या घटना हे सारं आपल्या परिचयाचं आहे. थोड्याफार फरकानं ही माणसं आपल्या गावाकडचीच आहेत. असं मला वाटू लागलं, माणदेशातील माणसं माडगूळकरांच्या लेखनाचा विषय होऊ शकतात, तर आपल्या गावाकडची माणसं आपल्या लेखनाचा विषय का होऊ नयेत, असा विचार माझ्या मनात आला. या विचारातूनच माझ्या लेखनानं आकार घेतला.''[१]

म्हणजेच व्यंकटेश माडगूळकरांच्या प्रेरणेतूनच बोराडे लेखनास प्रवृत्त झाल्याचे स्पष्ट होते. परंतु असे असले तरी त्यांनी कुणाचं अनुकरण केलं नाही. ते म्हणतात, ''मला जसं लिहावं वाटलं तसं मी लिहीत गेलो. अर्थात मी लिहायला आरंभ केल्यानंतर केवळ व्यंकटेश माडगूळकरांचेच लेखन वाचलं असं नाही, तर शंकर पाटील यांचं लेखन वाचलं, द. मा. मिरासदार यांचे लेखन मी वाचलं. केवळ ग्रामीण कथा-लेखकांचं लेखन मी वाचलं असं नाही, तर नागरी लेखकांचं लेखनही मी वाचलं. तुम्हाला सांगितलं तर कदाचित आश्चर्य वाटेल. पण या काळात अन्य कुणा ग्रामीण कथालेखकांच्या कथांपेक्षा पु. भा. भावे यांच्या कथांनी मला अधिक प्रभावित केलं होतं. याचा अर्थ या सर्वच लेखकांच्या लेखनाचं मी

अनुकरण केलं असं म्हणणं बरोबर होणार नाही."[२]

रा. रं. बोराडे यांनी व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील तसेच पु. भा. भावे यांचे साहित्य वाचले, त्यातून त्यांना लेखनासाठी प्रेरणा मिळाली. परंतु त्यांनी मात्र आपली स्वतंत्र वाट शोधली आहे. आपल्या लेखनाच्या वाटचालीत नियतकालिकांचा असलेला वाटा कसा महत्त्वपूर्ण आहे, त्यासंबंधी ते एका मुलाखतीत म्हणतात, "काही नियतकालिकांच्या संपादकांनी माझ्या प्रकृतीनुसार केलेले लेखन स्वीकारले आणि आवर्जून छापले. अशा प्रकारचे लेखन मी सातत्याने करावे अशा प्रकारचा आग्रह करू लागले. याचा स्पष्ट अर्थ मला जाणवला तो असा की, माझा स्वतःचा असा वाचकवर्ग आता निर्माण झाला आहे. त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला व तेव्हापासून मी माझ्या प्रकृतीला अनुसरून लेखन करू लागलो. माझी स्वतंत्र वाटचाल सुरू होण्यात या नियतकालिकांच्या संपादकांचा निश्चितच वाटा आहे."[३]

ग्रामीण जीवनाचे सर्जन असलेले रा. रं. बोराडे हे कथाकार म्हणून केवळ मराठवाड्यापुरतेच मर्यादित नाहीत; तर संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांचे नाव एक ग्रामीण संवेदनशीलता असणारा लेखक म्हणून घेतले जाते. त्यांनी कथाकथन, परिसंवाद, व्यासपीठे यांच्या माध्यमातून स्वतःचा चाहता वर्ग मिळविला. त्यांच्या साहित्यात ग्रामीण जीवनाचे समग्र दर्शन घडते. समाजजीवनाचा शोध आणि प्रतिशोध त्यांचे साहित्य गंभीरपणे घेते म्हणूनच रा. रं. बोराडे यांना 'ग्रामीण जीवनाचे भाष्यकार'[४] असे जनार्दन वाघमारे यांनी म्हटले आहे.

**<u>कादंबरी लेखनामागची भूमिका आणि प्रेरणा</u> :**

कथाकार म्हणून नावारूपास आलेले रा. रं. बोराडे हे काही कालावधीनंतर कादंबरीलेखन सुरू करतात. या विषयी रा. ग. जाधव यांनी घेतलेल्या मुलाखतीत ते म्हणतात, "जीवनाचं सर्वांगीण दर्शन घडवायला कथासाहित्य हे नेहमीच अपुरं, तोकडं ठरत आलेलं आहे. कथासाहित्यातून जीवनाचं एखादं अंग, एखादं विशिष्ट रूप वाचकांच्या समोर येतं. माझ्या ग्रामीण कथासाहित्यातून देखील नेमकं हेच घडत आलेलं आहे. मी जे ग्रामीण जीवन अनुभवलं ते माझ्या कथा लेखनातून पूर्णपणाने आणि पुरेशा अर्थपूर्णतेनं व्यक्त होऊ शकलं नाही म्हणून नंतरच्या काळात मी इतर साहित्यप्रकारांच्या माध्यमाचा स्वीकार केला. 'पाचोळा' ही कादंबरी लिहिली. 'विहीर' हे नाटक लिहिलं. याच काळात काही नाटकांचं लेखनही मी केलं. ग्रामीण जीवनाचं पूर्णांशानं व अधिक अर्थपूर्ण चित्रण इतर वाङ्मयप्रकारांतून साकारता

येईल, असं मला वाटलं आणि म्हणूनच मी कादंबरी व नाट्यलेखनाकडे वळलो''[५]

रा. रं. बोराडे हे प्रामुख्याने ग्रामीण कथाकार म्हणून मराठी साहित्यक्षेत्रात परिचित आहेत. केवळ ग्रामीण कथेच्या क्षेत्रातच नव्हे तर मराठी कथेच्या दालनातही त्यांनी आपल्या कलासंपन्नतेची भर टाकलेली आहे. परंतु असे असताना ते कादंबरी लेखनाकडे का वळले? कादंबरी वाङ्मयाच्या निर्मितीमागील त्यांची प्रेरणा कोणती होती? कादंबरी क्षेत्रात त्यांनी एखादा नवीन प्रयोग केला आहे काय? मराठी ग्रामीण कादंबरी क्षेत्रात त्यांचे स्थान कोणते? कादंबरीकार म्हणून ते कितपत यशस्वी झाले? या आणि अशा अनेक प्रश्नांचा शोध 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचा अभ्यास करताना घ्यावयाचा आहे.

बोराडेपूर्वकालीन व्यंकटेश माडगूळकरांपासून ते शंकर पाटील, रणजीत देसाई, उद्धव शेळके आणि समकालीन कादंबरीकारामध्ये आनंद यादव इ. लेखक प्रथम कथाकार म्हणून नावरूपास आले आणि नंतर ते जाणीवपूर्वक कादंबरी लेखनाकडे वळले. याला अपवाद रा. रं. बोराडे हेही नाहीत. आपल्या अनुभवविश्वाची व्याप्ती अभिव्यक्त करण्यासाठी त्यांनी ग्रामीण कादंबरी हा वाङ्मयप्रकार हाताळला असून, त्यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांमधून काही नवे प्रयोग करण्याचाही त्यांनी प्रयत्न केलेला आहे.

## रा. रं. बोराडे यांचे वाङ्मयीन कर्तृत्व :

रा. रं. बोराडे यांनी अनेक वाङ्मयप्रकार हाताळलेले आहेत. त्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, एकांकिका, लोकनाट्य, समीक्षा अशा विविध प्रकारांमध्ये त्यांनी लेखन केले आहे. त्यामधील काही कलाकृतींना उत्कृष्ट वाङ्मयीन निर्मितीचे पुरस्कारसुद्धा मिळाले आहेत. साहित्यप्रकारानुसार त्यांच्या लेखनाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

### कथासंग्रह :

बार्शी येथील सुलाखे हायस्कूल मध्ये मॅट्रिकच्या वर्गात शिकत असताना म्हणजे १९५७ सालापासून त्यांनी लेखनाला सुरूवात केली. १९५७ साली सकाळनं रौप्यमहोत्सवी वर्ष साजरं केलं होतं. या रौप्यमहोत्सवी वर्षाचा भाग म्हणून सकाळनं महाराष्ट्रातील शालेय विद्यार्थ्यांसाठी एक लेखनस्पर्धा जाहीर केली होती. या स्पर्धेत बोराडे यांनी लिहिलेल्या 'वसुली' या कथेला पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळालं होतं. तेव्हापासून त्यांच्या मनात आपल्याला लिहिता येतं ही जाणीव निर्माण झाली.

रा. रं. बोराडे हे उत्कृष्ट ग्रामीण कथालेखक आहेत. त्यांनी जवळजवळ पंधरा कथासंग्रह

लिहिलेले आहेत. त्यामध्ये - 'पेरणी' (१९६२), 'ताळमेळ' (१९६६), 'मळणी' (१९६७), 'मळणी' या कथासंग्रहास उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा राज्य पुरस्कार मिळाला. 'वाळवण' (१९७६), 'बोळवण' (१९७६) 'माळरान' (१९७६), 'नातीगोती' (१९७५), 'राखण' (१९७७), 'वरात' (१९७६), 'फजितगाडा' (१९७३), 'गोंधळ' (१९७८), 'खोळंबा' (१९७३), 'हेलकावे' (१९९०), 'वानवळा' (१९७९) तर उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार मिळालेला आणखी एक कथासंग्रह म्हणजे 'कणसं आणि कडबा' (१९९४) हा होय.

**कादंबऱ्या :**

कथाकार म्हणून मराठी साहित्यात स्थिर झाल्यानंतर बोराडे यांनी कादंबरी लेखनास सुरूवात केली. त्यांनी लिहिलेली पहिलीच कादंबरी 'पाचोळा' (१९७१) ही होय. तिलाही उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा राज्य पुरस्कार मिळाला आहे. तसेच या कादंबरीला १९८८-८९ या वर्षाचा कै. भैरू रतन दमाणी साहित्य पुरस्कारही मिळाला. त्यानंतर त्यांनी 'सावट' (१९८७) 'चारापाणी' (१९९०) ह्या कादंबऱ्या लिहिल्या. 'चारापाणी' या कादंबरीला १९९० चा मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद या साहित्य संस्थेचा कै. नरहर कुरूंदकर पुरस्कार मिळाला. यानंतर त्यांनी 'आमदार सौभाग्यवती' (१९८८) 'महानगाव' (१९९३) आणि 'रहाटपाळणा' (१९९६) इ. कादंबऱ्या तसेच 'शिका, तुम्ही हो शिका' (१९९३) ही बालकादंबरी लिहिली. बोराडे यांच्या प्रत्येक कादंबरीत काहीतरी नवीन प्रयोग केल्याचा प्रत्यय येत राहतो.

**नाटक :**

रा. रं. बोराडे यांनी 'नाटक' हा वाङ्मयप्रकारही हाताळलेला आहे. ग्रामीण नाटकाचं प्रमाण फारच कमी आहे असं त्यांना वाटतं. मराठी नाटकांमध्ये ग्रामीण जीवनाचं चित्रण यावं असं त्यांना मनापासून वाटतं. तसा त्यांचा प्रयत्नही असलेला दिसून येतो. त्यांनी 'पिकलं पान' (१९७९) 'विहीर' (१९८२) आणि 'बंधमुक्ता' (१९९८) इ. नाटके लिहिली.

**नाटिका / एकांकिका संग्रह :**

रा. रं. बोराडे यांनी काही एकांकिका संग्रह ही लिहिले आहेत. त्यामध्ये 'चूकभूल द्यावी न घ्यावी' (१९७२), 'आज नाटक व्हणार न्हाई' (१९७८), 'पाच ग्रामीण नाटिका' (१९८७) आणि 'चोरीचा मामला' (१९९६) इ. नाटिका लिहिल्या. यातील 'पाच ग्रामीण नाटिका' आणि 'चोरीचा मामला' या एकांकिका संग्रहांना उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचे राज्य पुरस्कारही मिळाले आहेत.

**वगनाट्य :**

रा. रं. बोराडे यांनी वगनाट्यलेखनाचाही प्रयत्न केलेला दिसतो. त्यामध्ये 'कश्यात काय अन् फाटक्यात पाय' (१९७६) आणि 'हसले गं बाई फसले' (१९८७) इ. वगनाट्ये लिहिली आहेत.

**पथनाट्य :**

रा. रं. बोराडे यांनी केवळ एकच पथनाट्य लिहिले आहे ते म्हणजे 'आम्ही लेकी कष्टकऱ्यांच्या' (१९८७) हे होय.

**समीक्षा लेखसंग्रह :**

रा. रं. बोराडे यांनी आपले ग्रामीण साहित्याविषयीचे, ग्रामीण साहित्य चळवळीविषयीचे विचार व्यक्त केले आहेत. अशा मतांचा, लेखांचा 'ग्रामीण साहित्य' या ग्रंथात समावेश होतो. ग्रामीण साहित्याविषयी, चळवळीविषयी त्यांनी आपले विचारपूर्वक चिंतनच या समीक्षा ग्रंथाच्या रूपाने वाचकासमोर येते. अशाप्रकारे बोराडे यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा आढावा घेता येईल.

**बोराडेंच्या कादंबऱ्यांचा समावेश लघुकादंबऱ्यांमध्ये का ? :**

कथा लेखनला सुरूवात करून जवळजवळ एक तप पूर्ण झाल्यानंतर बोराडे यांची पहिली कादंबरी प्रकाशित झाली. एवढ्या दीर्घ कालावधीनंतर ते कादंबरीलेखनाकडे वळले; म्हणजेच कादंबरी लेखनामागची उद्दिष्ट्ये निश्चित होती. त्यांनी आतापर्यंत 'पाचोळा', 'सावट', 'चारापाणी', 'आमदार सौभाग्यवती', 'महानगाव', 'रहाटपाळणा' अशा कादंबऱ्यांचे लेखन केलेले आहे. मात्र बोराडे यांच्या सर्वच कादंबऱ्या आकाराने लहान आहेत. दीर्घकथा वाटाव्यात अशी त्यांची कादंबरी आवाक्याने छोटी वाटते. बोराडे आपल्या कादंबऱ्यांचा आवाका व्यापक, विस्तृत करू शकत नाहीत याविषयी द. ता. भोसले म्हणतात, "या प्रश्नाचा मागोवा घेत असताना एक शक्यता अशी दिसते की, बोराडे यांची प्रतिभा प्रामुख्याने कथालेखकाची प्रतिभा आहे. कारण साहित्यनिर्मितीचा प्रारंभच त्यांनी कथेने केला आहे. आणि एकूण साहित्यनिर्मितीत त्यांच्या कथासंग्रहांची संख्याही मोठी आहे. स्वाभाविकच कथालेखनाचे 'कुशलत्व' त्यांच्या प्रतिभेने सहजपणे संपादन केलेले असावे."[६]

द. ता. भोसले यांचे वरील विधान सत्य असले तरी त्याची दुसरी बाजूही इथे महत्वाची वाटते, ती म्हणजे रा. रं. बोराडे यांनाच पाल्हाळपणा आवडत नाही. जे काही सांगायचे आहे,

मांडायचे आहे ते नेमकेपणाने मांडणे, शिवाय त्यांच्या कलाकृतीचा विषय केवळ ग्रामजीवन हाच असल्यानेही विस्तृत आवाक्याला मर्यादा पडत असाव्यात. परिणामी त्यांच्या कादंबऱ्या आकाराने लहान होतात, म्हणून 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचा समावेशही लघुकादंबऱ्यांमध्येच करता येईल.

**ग्रामीण व दलित साहित्याविषयी बोराडे यांचे मत :**

नगर येथे झालेल्या दलित साहित्य संमेलनातील भाषणामध्ये बोराडे म्हणतात, "नागरी वाचकांच्या बरोबरीनं आता ग्रामीण वाचकांचीही संख्या वाढत आहे. नागरी मनोवृत्तीच्या वाचकांच्या व समीक्षकांच्या पसंतीला उतरावं, म्हणून आत्यंतिक कलावादाच्या आहारी गेलेले ग्रामीण साहित्य आता आशयाला प्राधान्य देत आहे. याची कारणं सध्याच्या ग्रामीण परिस्थितीत आहेत. आज ग्रामीण भागात प्रचंड स्वरूपाचा असंतोष व असमाधान खदखदत आहे. खेड्यातला तरूण शिकला. वेगवेगळ्या नोकरीमध्ये तो शिरकाव करणार, एवढ्यात राखीव जागांचा प्रश्न आला. त्यापाठोपाठ बॅकलॉग आला. परिणामी धड शेतीही करता येत नाही आणि नोकरीही करता येत नाही अशी अवस्था ग्रामीण नवशिक्षित तरूणांची झाली. शेतीचं विभाजन झाल्यामुळं शेती करण्याचा प्रश्न अधिकच बिकट झाला. विकासाच्या नावाखाली खेडी भकास झाली. धरणग्रस्त गावांचं योग्य असं पुनवर्सन झालं नाही. ग्रामीण विकासाच्या नावाखाली अनेक योजना आल्या. पण त्याचा बहुसंख्य शेतकऱ्यांना क्वचितच फायदा झाला. बागायतदारांच्या रूपानं भांडवलदारांचा नवा वर्ग जन्माला आला. ग्रामीण भागातल्या आर्थिक नाड्या या भांडवलदारांच्या हाती एकवटल्या. या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणून ग्रामीण भागात प्रचंड स्वरूपाचं असमाधान व असंतोष खदखदत आहे. हे असमाधान व असंतोष आज ग्रामीण साहित्यात येत आहे. दलित साहित्यात येणारे प्रश्न सामाजिक स्वरूपाचे आहेत तर ग्रामीण साहित्यात येऊ पाहणारे प्रश्न आर्थिक स्वरूपाचे आहेत. दलित साहित्याचा प्रवाह व ग्रामीण साहित्याचा प्रवाह आता समांतर वाहणार आहेत."[७]

रा. रं. बोराडे यांच्या वरील विचारातून दलित साहित्याचा प्रवाह आणि ग्रामीण साहित्याचा प्रवाह आता समांतर असे वाहणार आहेत ते काही अंशी बरोबर आहे कारण आजच्या बदलत्या वास्तवानुसार ग्रामीण भागातील बहुजन समाजातील तरूण आर्थिकदृष्ट्या शोषित आहेत. तर दलित समाजातील तरूण हा सामाजिक आणि आणि आर्थिकदृष्ट्या शोषित आहे. म्हणून दोन्ही साहित्यप्रवाहातील हा एक समान धागा होऊ शकतो या भूमिकेतून

त्यांनी वरील विचार मांडलेला आहे. हे वास्तव नाकारता येत नाही. यामध्ये दलित साहित्यिकांना खूष करण्याचा भाग नाही असे वाटते.

**<u>ग्रामीण साहित्याच्या चळवळीविषयी बोराडे यांचे मत :</u>**

ग्रामीण साहित्याच्या चळवळीविषयी रा. रं. बोराडे म्हणतात, ''ग्रामीण साहित्याची चळवळ ही काळाच्या गरजेतून निर्माण झालेली आहे. त्यामुळे या चळवळीची गरज नाही, असं म्हणताच येत नाही. शिक्षणाचं लोण आता केवळ खेड्यात पोहोचलेलं आहे, असं नाही तर खेड्यातल्या निरनिराळ्या सामाजिक स्तरांपर्यंत पोहोचलेलं आहे. याचा अपरिहार्य परिणाम म्हणून महाराष्ट्रातल्या विविध भागांत ग्रामीण लेखक जन्माला येत आहेत. नव्या उमेदीनं, नव्या ताकदीनं ते लिहीत आहेत. पण प्रसिद्धीची माध्यमं अद्यापी मुंबई-पुण्याबाहेर फारशी आलेली नाहीत. या ग्रामीण लेखकांच्या लेखनामध्ये अनुभवाची विविधता आहे. आत्यंतिक स्वरूपाच्या कलावादाच्या आहारी न जाता अनुभवाचे सच्चेपण कायम ठेवून ग्रामीण साहित्याची निर्मिती करण्याची त्यांची धडपड सुरू आहे. पण मराठी नियतकालिकांच्या तोंडवळ्यामध्ये बदल न झाल्यामुळे त्यांच्या लेखनाची कोंडी होत आहे. प्रसिद्धीमाध्यमांवर माझा राग असण्याचं हे एक कारण आहे. या ग्रामीण साहित्यिकांना दिशा नाही. ही दिशा देण्याचं या ग्रामीण साहित्यिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचं, ते ज्या परिसरात राहतात, त्या परिसरात वाङ्मयीन वातावरण निर्माण करण्याचं काम या चळवळीद्वारे होईल, असा मला विश्वास आहे.''[८]

उपरोक्त मतावरून लक्षात येते की, रा. रं. बोराडे हे स्वातंत्र्योत्तर काळातील बहुजन समाजाच्या पहिल्या सुशिक्षित पिढीचे प्रतिनिधी आहेत. ग्रामीण भागात राजकीय सत्ता आहे, परंतु सांस्कृतिक सत्तेची केंद्रे मात्र निर्माण होत नाहीत, याची खंत बोराडे यांना वाटते. म्हणून ग्रामीण भागात ग्रामीण नेतृत्व निर्माण करणे, तशी प्रेरणा देणे, त्यांना लिहिण्याची संधी उपलब्ध करून देणे हे अतिशय आवश्यक आहे. यासाठी स्वतः लेखक रा. रं. बोराडे प्रयत्नशील असल्याचे दिसतात. ग्रामीणांची वेगळी संस्कृती, बोली, त्यांच्या जगण्याच्या पद्धती मानवी संबंध हे सर्व वैशिष्ट्यपूर्ण असे आहे. ग्रामीण जीवनास स्वतःचा असा सांस्कृतिक अर्थ आहे, आशय आहे. नागरी संस्कृतीशी ग्रामीण संस्कृतीची लय जुळणार नाही; म्हणून स्वतःच्या अस्मितेचा शोध घेणे आवश्यक आहे असे बोराडे यांना वाटते.

**ग्रामीण साहित्य चळवळीच्या यशस्वितेबद्दल बोराडेंचे मत मत :**

ग्रामीण साहित्य चळवळ यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणारी काही मते मांडताना बोराडे म्हणतात, ''कोणत्याही चळवळीला निश्चित असं अधिष्ठान असायला हवं. तसंच तिला समूहाचं पाठबळही असायला हवं. त्याशिवाय ती यशस्वी होणे अवघड असतं. हा समूहदेखील केवळ अनुयायांचा अथवा एकमेकांची भलावण करणाऱ्यांचा समूह असून चालत नाही. तर उद्दिष्टानं भारावलेल्या, विचाराने प्रेरित झालेला, समविचारी व्यक्तीचा समूह असायला हवा.. तसेच ही चळवळ महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण साहित्यिकांची चळवळ म्हणून जोपासली गेली तरच ती यशस्वी होईल... ग्रामीण साहित्याच्या या चळवळीला सुसंघटित स्वरूप यायला हवं. ती अधिक जोमाने वाढायला हवी. तिची दिशा स्पष्ट व्हायला हवी. ग्रामीण साहित्याच्या चळवळीविषयी आस्था असणाऱ्या सर्वांनीच याचा गंभीरपणे विचार करायला हवा.''[१]

ग्रामीण साहित्य चळवळीच्या यशस्वितेविषयी बोराडे यांनी मांडलेले विचार योग्यच आहेत. उद्दिष्टानं भारावलेला आणि विचारानं प्रेरित झालेला समविचार व्यक्तीचा समूह यासाठी त्यांना आवश्यक वाटतो. या चळवळीविषयी आस्था असणाऱ्यांची इथे आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील सर्व ग्रामीण साहित्यिक या चळवळीत सामील झाले तर ही चळवळ निश्चित यशस्वी होइल असे बोराडे यांना वाटते.

**सारांश :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये रा. रं. बोराडे यांची ग्रामीण साहित्यिक म्हणून ग्रामीण साहित्याविषयीची आणि कादंबरी लेखनामागील भूमिका व प्रेरणा यांचा विचार केला आहे. तसेच त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्त्व लक्षात घेऊन त्यांनी मराठी वाङ्मयाला दिलेल्या योगदानाचाही विचार या प्रकरणात केला आहे.

मराठी ग्रामीण कथा-कादंबरीच्या क्षेत्रात व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील यांच्यानंतर बोराडे यांनाच स्थान द्यावे लागते. रा. रं. बोराडे यांनी मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. ग्रामीण जीवनातील सामाजिक प्रश्न, वास्तवता आणि नात्यागोत्यातील परस्पर भावबंध, त्यातून निर्माण झालेले ताणतणाव याचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण रा. रं. बोराडे यांनी आपल्या कथा-कादंबऱ्यामध्ये केलेले आहे.

रावसाहेब रंगराव बोराडे यांचा जन्मही एका सामान्य अशा शेतकरी कुटुंबात झाला.

त्यामुळे त्यांच्या बालमनावर तेथील जीवनाचे काही संस्कार झाले. तेथील दरिद्री, अडाणी, अज्ञानी खेडूत माणूस, त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती-परंपरा हे त्यांनी जवळून अनुभवलेलं खेडूत जीवनच त्यांच्या लेखनाचा विषय झाले.

बोराडे यांनी लेखनाचा प्रारंभ 'वसूली' ही कथा लिहून केला. त्या कथेला प्रथम क्रमांकाचं पारितोषिकही मिळालं. यामुळे त्यांच्यामध्ये लेखनाविषयी आणखी आवड निर्माण झाली. आपल्याला लेखनासाठी व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्यवाचनातून प्रेरणा मिळाल्याचं बोराडे सांगतात. तसेच शंकर पाटील, पु. भा. भावे यांचे साहित्यही त्यांनी आवडीने वाचले होते. परंतु त्यांनी कधी कुणाचे अनुकरण केले नाही. काही नियतालिकांचा, तसेच नियतकालिकाच्या संपादकांचाही आपल्या लेखनाच्या वाटचालीत वाटा असल्याचं बोराडे मान्य करतात. त्यांनी आपल्या लेखनातून स्वतःची नवी वाट शोधली. आणि स्वतःचा असा वाचकवर्ग, चाहतावर्ग निर्माण केला. त्यांचे साहित्य समाजजीवनाचा शोध गंभीरपणे घेते. म्हणूनच 'ग्रामीण जीवनाचे भाष्यकार' अशा सार्थ शब्दात जनार्दन वाघमारे त्यांचा गौरव करतात.

रा. रं. बोराडे यांनी ग्रामीण आणि दलित साहित्य चळवळीविषयी, वेळोवेळी आपले विचार व्यक्त केले आहेत. ग्रामीण साहित्यात आर्थिक स्वरूपाचे प्रश्न येतात तर दलित साहित्यात सामाजिक स्वरूपाचे प्रश्न येतात. ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य हे दोन्हीही प्रवाह समांतर वाहतील असा बोराडे यांना आशावाद वाटतो. ग्रामीण भागात विकासाच्या नावाखाली खेडी भकास होतात. भांडवलदारांच्या हातीच ग्रामीण भागातल्या आर्थिक नाड्या एकवटलेल्या असतात. त्याविषयीचे असमाधान ग्रामीण साहित्यात येताना दिसते. ग्रामीण तरूणांना लिहिते करणं, त्यांना नवी दिशा देणं अशा साहित्यिकांमध्ये आत्मविश्वास वाढविणंही त्यांना आवश्यक वाटते. ग्रामीण भागात सांस्कृतिक सत्तेची केंद्रे निर्माण व्हावीत. उद्दिष्टांनी भारावलेला आणि विचाराने प्रेरित झालेल्या व्यक्तींचा समूह ग्रामीण साहित्याची चळवळ यशस्वी होण्यासाठी निर्माण होणं गरजेचं आहे, असे मत ते प्रकट करतात. या चळवळीविषयी त्यांच्यात आस्था असणंही त्यांना आवश्यक वाटते.

साहित्यलेखनामागची प्रेरणा त्यांना मराठवाड्यातील ओसाड माळरानातील माणसांकडून मिळाली आहे. प्रथम कथाकार म्हणून नावारूपास आल्यानंतर ते कादंबरी लेखनाकडे वळले. कारण मानवी जीवनाचं सर्वांगीण दर्शन घडविण्यासाठी कथासाहित्य अपुरे

पडते. आपल्या अनुभवविश्वाची व्याप्ती अभिव्यक्त करण्यासाठी त्यांनी ग्रामीण कादंबरी हा वाङ्मयप्रकार हाताळला आहे.

रा. रं. बोराडे यांचे वाङ्मय कर्तृत्व लक्षात घेतले असता त्यांनी चौदा कथासंग्रह, सहा कादंबऱ्या, तीन नाटके, चार एकांकिता संग्रह, दोन लोकनाट्य, एक समीक्षा लेख संग्रह, एक बालकादंबरी असे विपुल वाङ्मय लिहिले आहे. तसेच अनेक वाङ्मयप्रकार हाताळले आहेत. प्रस्तुत प्रबंधिकेत त्यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या दोन कादंबऱ्यांचाच विचार अभिप्रेत आहे. त्यांच्या कादंबऱ्यांचा समावेश प्रामुख्याने लघुकादंबऱ्यांमध्ये होताना दिसतो.

अशा प्रकारे या प्रकरणात रा. रं. बोराडे यांचा ग्रामीण साहित्यिक म्हणून थोडक्यात परामर्श घेतला. त्यांची ग्रामीण साहित्याविषयीची भूमिका तसेच कादंबरी लेखनामागील प्रेरणा व भूमिका याचाही विचार केला आहे. त्यांनी मराठी साहित्याला दिलेल्या योगदानाचाही परामर्श घेतला आहे. पुढील प्रकरणामध्ये त्यांच्या 'सावट' आणि 'चारापाणी' या कादंबऱ्यांचे आशयविश्व पहावयाचे आहे.

14133
A

## संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १) रा. रं. बोराडे | 'ग्रामीण साहित्य' | पृ. ९१ |
| २) रा. रं. बोराडे | 'ग्रामीण साहित्य' | पृ. ९२ |
| ३) नागनाथ कोत्तापल्ले | 'ग्रामीण साहित्य : स्वरूप व शोध | पृ. १२२ - १२३ |
| ४) जनार्दन वाघमारे | 'प्रतिष्ठान' मे-जून १९९० | पृ. ९ |
| ५) रा. रं. बोराडे | 'ग्रामीण साहित्य' | पृ. ८३ |
| ६) द. ता. भोसले | 'घरशिवार' (संपा. चंद्रकुमर नलगे) | पृ. १२४ |
| ७) रा. रं. बोराडे | 'ग्रामीण साहित्य' | पृ. ९७ |
| ८) रा. रं. बोराडे | 'ग्रामीण साहित्य' | पृ. ९५ - ९६ |
| ९) रा. रं. बोराडे | 'ग्रामीण साहित्य' | पृ. ९६ |